**नि.दि.मु.क्र.०९/२००९ मधील निशाणी क्र.१६४ वरील आदेश**

**(CNR No. MHSI080000972009)**

०१. प्रस्तूत अर्ज वादी यांनी मयत प्रतिवादी क्र.०९ रजनी देवू भोसले उर्फ रजनी सदाशिव धामापुरकर यांचे कायदेशीर वारस मुदतीत रेकॉर्डवर न आणल्याने प्रतिवादी क्र.०९ विरुध्द झालेला अबेटमेंट आदेश रद्द होऊन मिळणेकरीता विनंती केली आहे. त्यांनी असे कथन केले आहे की, प्रतिवादी क्र.०९ यांचे शासकीय अभिलेखामध्ये सुचिता सदानंद धामापुरकर असे नाव आहे व प्रतिवादी क्र.०९ ह्या दि. ०९/१२/२०१६ रोजी मयत झाल्या आहेत. प्रतिवादी क्र.०९ ही आपल्या कुटुंबासमवेत पालघर येथे राहत होती व वादी हे कायम गावी राहत असल्याने वादीचा काही संपर्क नव्हता. त्यामुळे, प्रतिवादी क्र.९ ही मयत असल्याची माहिती वादीला नव्हती. त्यामुळे प्रस्तूत दावा प्रतिवादी क्र.०९ विरुध्द अबेट झाला आहे. सबब, प्रस्तूत प्रतिवादी क्र.०९ विरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द करुन मिळणेबाबत वादी यांनी विनंती केली आहे.

०२. प्रतिवादी क्र.१ यांनी सदर अर्जावर आपले म्हणणे दाखल केले आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, प्रस्तूत कामी प्रतिवादी क्र.९ यांचे वारस अभिलेखावर आणणेस जाणीवपूर्वक विलंब केलेला आहे. सदर विलंब ६ वर्षे ६ महिने १२ दिवसांचा इतका आहे. प्रस्तूत केस सुनावणीला आल्यानंतर वादी यांनी प्रतिवादी क्र.९ चे वारस अभिलेखावर आणलेले आहेत. वादी हे प्रतिवादी यांना केवळ मानसिक त्रास देण्याच्या उद्देशाने जाणीवपूर्वक विलंब करत आहेत हे दिसून येते. त्यामुळे, प्रस्तूत अर्ज नामंजूर करण्यात यावेत. जर अर्ज मंजूर करणेचे झाल्यास प्रतिवादीस रक्कम रु.१,०००/– इतका खर्च देववण्यात यावा अशी विनंती केली आहे.

०३. अर्ज व त्यावरील जबाब तसेच, उभय पक्षाच्या विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले असता अर्जात नमुद कारणे ही योग्य असल्याचे दिसून येते. प्रस्तूत दावा हा वाटप व पृथ्थक कब्जाकरीता दाखल केला आहे. प्रस्तूत प्रतिवादीचे वारस हे दाव्यास आवश्यक पक्षकार आहेत. परीणामी, दाव्याचे स्वरुप लक्षात घेता, प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे योग्य वाटते. करीता, खालील प्रमाणे आदेश पारित करत आहेः

**– आदेश –**

१. निशाणी क्र.१६४ वरील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी क्र.०९ विरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश न्यायपुर्ततेकरीता रद्द करण्यात येत आहे.

SHAIEKH TAJJUM SHAIEKH HAMID
Digitally signed by SHAIEKH TAJJUM SHAIEKH HAMID
Date: 2024.04.03 17:47:14 +0530

स्थळ : कणकवली (टी.एच.शेख)

दिनांक : ०३/०४/२०२४ दिवाणी न्यायाधीश क.स्तर, कणकवली.